# ॥ रिकामे मधुघट ॥

भा. रा. तांबे   १९३३

मधु मागशि माझ्या सख्या,  परी
मधुघटचि रिकामे पडति घरीं!  ॥ धृ ॥

आजवरी कमळाच्या द्रोणीं
मधू पाजिला तुला भरोनी,
सेवा ही पूर्विची स्मरोनी
करिं रोष न सखया,  दया करी .  ॥ १ ॥

नैवेद्याची एकच वाटी
अता दुधाची माझ्या गाठीं;
देवपुजेस्तव ही कोरांटी
बाळगीं अंगणीं कशी तरी .  ॥ २ ॥

तरुण -  तरुणिंचि सलज्ज कुजबुज,
वृक्षझऱ्यांचें गूढ मधुर गुज,
संसाराचें मर्म हवें तुज,
मधु पिळण्या परि रे बळ न करीं!  ॥ ३ ॥

ढळला रे ढळला दिन सखया!
संध्याछाया भिवविति हृदया,
अता मधूचें नांव कासया?
लागले नेत्र रे पैलतिरीं.  ॥ ४ ॥